

प्राचार्य डॉ. विजयसिंह सावंत यांचा सत्कार करताना महेश बर्गे, सुनील बर्गे, प्रा. बी. डी. भोसले, प्रा. चंद्रकांत जावळे, प्रा. डॉ. बी. एस. चव्हाण, पंकज बर्गे.

# प्राचार्य डॉ. विजयसिंह सावंत यांचा सत्कार

**कोरेगाव**, दि. २३ : बहुजन समाजातील मुला-मुलींच्या पदव्युत्तर स्तरावर शिक्षणाची सोय झाल्याने कोरेगावकरांच्यावतीने रयत शिक्षण संस्थेच्या डी. पी. भोसले कॉलेजचे प्राचार्य डॉ. विजयसिंह सावंत यांचा सामाजिक कार्यकर्ते महेश बर्गे व सुनील बर्गे यांनी सत्कार केला.

कोरेगाव व परिसरातील छोट्या गावातील मुलांसाठी उच्च शिक्षणाचे केंद्र म्हणून डी. पी. भोसले कॉलेज वरदान ठरत आहे. जून १९६८ मध्ये या कॉलेजची स्थापना झाली असून, स्थापनेपासून या कॉलेजमध्ये पदवीस्तरावर मराठी, इंग्रजी, हिंदी, अर्थशास्त्र, इतिहास, भूगोल, वाणिज्य, रसायन शास्त्र व संगणक आदी विषयांची शिक्षणाची सोय होती. परंतु पदव्युत्तर स्तरावर उच्च शिक्षणाची सोय नसल्याने ग्रामीण भागातील विद्यार्थी वंचित राहत होते. गेल्या दोन वर्षांच्या कालखंडात प्राचार्य डॉ. विजयसिंह सावंत यांच्या अथक परिश्रमातून कॉलेजचा चेहरा-मोहरा बदलून गेला आहे. भले मोठे क्रीडांगण, इनडोअर स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स, अद्ययावत व सुसज्ज ग्रंथालय, मुलांची एन. सी. सी., मुलींची प्री. एन. सी. सी., एन. एस. एस., पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्र, मुला-मुलींसाठी स्वतंत्र अभ्यासिका, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ दूर शिक्षण केंद्र, यु. जी. सी.चा पत्रकारिता आणि जनसंवाद प्रमाणपत्र अभ्यासक्रम, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र आदी शैक्षणिक व भौतिक सुविधा उपलब्ध करण्यात आल्या आहेत.

या शैक्षणिक वर्षापासून बी. ए., बी. कॉम., व बी. एस्सी. भाग-१ च्या पाच अतिरिक्त तुकड्यांना मान्यता, बी. एस्सी. भाग-१ . च्या स्तरावर मायक्रोबायोलॉजी, बी. एस्सी. भाग-३ पदवी स्तरावर भौतिक शास्त्र व गणित तर पदव्युतर स्तरावर एम. ए. (मराठी) व एम. कॉम. पर्यंतच्या शिक्षणाची सोय झालेली आहे. डी. पी. भोसले कॉलेजने क्रीडा व शैक्षणिक क्षेत्रात आपल्या कार्याचा ठसा शिवाजी विद्यापीठामध्ये उमटवला आहे.

प्राचार्य डॉ. विजयसिंह सावंत यांच्यासह त्यांच्या सहकाऱ्यांनी घेतलेल्या अथक परिश्रमामुळे कोरेगावच्या कॉलेजचा नावलौकिक वाढत चाललेला आहे. त्यानिमित्त कोरेगावकर नागरिकांच्यावतीने महेश बर्गे व सुनील बर्गे यांनी त्यांचा सत्कार केला. यावेळी प्रा. बी. डी. भोसले, प्रा. चंद्रकांत जावळे, प्रा. डॉ. बी. एस. चव्हाण, पंकज बर्गे व नागरिक उपस्थित होते.

डी. पी. भोसले कॉलेज ग्रंथालय कोरेगांव